CNRNOMHSN090005382016

## नि.दि.मु.क्र.९४/२०१६ मधील नि.क्र.२४ व २६ खालील संयुक्त आदेश
## (आदेश पारीत दिनांक ०२/११/२०२३ रोजी)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे  वारस अभिलेखावर घेणेस  झालेला विलंब माफ करणेसाठी व अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून वादी यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकिदीसाठी  दाखल केला आहे.  वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की,  प्रतिवादी क्र. २ वसंत बापू जाधव  हे दि.०७.१०.२०२१ रोजी मयत झाले असुन त्यांचे  निशाणी क्र.२६ चे अर्जातील नमुद २/अ ते २/क हे कायदेशिर वारस आहेत.  तसेच, त्या वारसांना याकामी सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. २ हे मयत झालेनंतर त्याचे वारस दावेकामी ९० दिवसांत अभिलेखावर घेणे आवश्यक होते.  वादी हे प्रतिवादी क्र. २ यांचा मृत्यू दाखला मिळवणेसाठी नगरपरीषद तासगांव येथे गेले असता, त्यांनी मृत्यू दाखला देणेस नकार दिला. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र. २ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. वादी हे प्रतिवादी क्र. २ यांचा मृत्यू दाखला मिळविण्यासाठी वारंवार तासगांव नगर परीषदेमध्ये जात होते परंतू, तासगांव नगरपरीषदेने अदयाप त्यांना प्रतिवादी क्र. २ चा मृत्यू दाखला दिला  नाही.  वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास मुद्दाम  विलंब केलेला नाही.  म्हणून वादीने प्रतिवादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून  नि.क्र. १ मध्ये प्रतिवादी क्र. २ यांचे नावापूढे मयत असे नमुद करुन त्यांचे वारस अभिलेखावर  घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी  सदर अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे   दाखल करुन कथन केले आहे की, त्यांनी दिनांक १०/११/२०२१  रोजी नि.क्र. १९ कडे पुरशिस दाखल करुन प्रतिवादी क्र. २ मयत झालेचे कळविले होते.  त्यानंतर देखील वादीने सदर कामी पुर्तता केली नाही म्हणून प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०१/१०/२०२२ रोजी नि.क्र. २० ला दावा काढुन टाकणेबाबतचा अर्ज दिला. तद्ननंतर प्रतिवादी क्र.१ ने दिनांक

०६/०२/२०२३ रोजी नि.क्र. २३ कडे प्रतिवादी क्र. २ चा मृत्यूदाखला हजर केला. तरीदेखील वादी मृत्यूदाखल्याचे कारण देवुन तारखा घेत आहे. यावरुन वादी ने केवळ प्रतिवादीस त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसुन येते. त्यामुळे जर मे. न्यायालय वादीचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयातप्रत आल्यास वादीस जास्तीत जास्त दंड करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ वसंत बापू जाधव हे मयत झालेबाबत नि.२२/१ कडे मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ वसंत बापू जाधव हे दिनांक ०७.१०.२०२१ रोजी मयत झाले असुन दिनांक १७/११/२०२१ रोजी त्यांच्या मृत्यूची नोंद केली असल्याचे नमुद आहे. यावरुन वादी हे जाणून बुजून प्रतिवादी क्र. २ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेतले नाहीत हे स्पष्ट होते. तसेच नि.क्र. २० कडे प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा दावा काढून टाकणेबाबतचा अर्ज दिल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिल्याचे स्पष्ट होते. तथापि मुळ दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकरिता वादी यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. याकामी प्रतिवादी यांना झालेला त्रास वादी यांना द्रव्यदंड करुन भरुन काढता येवु शकतो. त्यामुळे वादी यांचा नि.२४ कडील विलंब माफी व अबेटमेंट सेटअसाईड अर्ज मंजूर करुन नि.२६ प्रमाणे प्रतिवादी क्र. २ चे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.२४ व २६ कडील अर्ज दंड रक्कम रु. १०००/- (रक्कम रुपये एक हजार) प्रतिवादी क्र. १ यास देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. दंड रक्कम प्रतिवादी यांना दिलेनंतर वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत दाखल करावी.

सही/XXX

**(डॉ.आर.एस.कुळकर्णी)**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

**तासगांव.**

**दि.०२.११.२०२३**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | **०२.११.२०२३** |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | **०२.११.२०२३** |
| आदेश अपलोड दिनांक | – | **०२.११.२०२३** |